ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ


LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg No. PNC-116. Licence No. 34

वर्ष ४० | पुणे, बुधवार ३ आणि १७ एप्रिल, १९७४ | अंक ७ आणि ८

'किर्लोस्कर पंप' हेच ना? हे पाणी खूप दूरचा प्रवास करीत आलं आहे. मोठ्या नळातून मैलांचे अंतर तोडीत... पण त्याला खेचीत आणलं कोणी? अर्थातच 'किर्लोस्कर पंपांनी' आणि आता ते आपल्या हाताजवळ नळात आहे.

पाणी पुरवठा... 'किर्लोस्कर पंपांचं' हे अत्यंत महत्त्वाचं काम. अनेक लहान मोठ्या शहरात, रात्रंदिवस, 'किर्लोस्कर पंप' हे काम करीत आहेत.

दुसरीहि अनेक कामं 'किर्लोस्कर पंप' करतात.



किर्लोस्कर

शेतीसाठी आणि औद्योगिक उपयोगासाठी पाणी पुरवठा करणं, तसेच सांडपाणी खेचणं ही कामंसुद्धा ते करीत असतात.

'किर्लोस्कर पंप' अनेक प्रकारचे आहेत... छोट्या मोनोब्लॉकपासून मोठ्या व्हर्टिकल टर्बाइन पंपांपर्यंतचे विविध प्रकार... छोट्या अगर मोठ्या, शहरी अगर ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी, गरजेनुसार यथायोग्य पंप. बरं, सुटे भाग सहज मिळतात. शिवाय विक्रीपूर्व आणि विक्रीनंतरची देखभाल सेवाहि सर्वत्र मिळू शकते.


किर्लोस्कर पंप, सर्वोत्तम पंप

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

उद्योग भवन, टिळक रोड, पुणे–४११ ००२

कार्यालये : अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कलकत्ता, नवी दिल्ली, इंदूर, जयपूर, मद्रास, सिकंदराबाद.

® Registered users : Kirloskar Brothers Ltd.



# आम्ही आता आपल्या ठेवीवर दरमहा व्याज देतो.

आपल्या मासिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास आमचाही हातभार व्हावा या हेतूने आम्ही ही नवी ठेवयोजना निर्मिली आहे. आपण किमान रु. १००० अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्याकडे मासिक व्याज ठेवयोजनेखाली किमान २४ महिनेपर्यंत ठेवा.

आमच्याकडून दरमहा मिळणाऱ्या व्याजातून आपण आपले भाडे, विद्युत बिल, टेलिफोन बिल, गॅस बिल, अशापैकी कोणतेही एक अथवा अनेक खर्च भागवू शकता.

**दरमहा व्याज मिळत राहून मूळ ठेव सुरक्षित राहते हे ह्या योजनेचे वैशिष्ट्य आहे.**

अधिक तपशिलाकरिता नजीकच्या आमच्या शाखेस आजच भेट द्या.

## बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस – ११७७, बुधवार पेठ, पुणे – २

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ३ आणि १७ एप्रिल, १९७४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## खाजगी कंपन्यांचे ठेवी आकर्षित करण्याचे प्रयत्न

उद्योगधंद्यांसाठी लागणारे भांडवल कमी पडू लागले म्हणजे खाजगी कंपन्या ठेवी घेण्यास प्रवृत्त होतात आणि त्या आकर्षित करण्यासाठी भारी दराने व्याज देऊ करतात. अशा कंपन्यांत ठेवी ठेवून अनेकजण बुडाल्याचेही ऐकू येते. तरीसुद्धा खाजगी उद्योगधंद्याचा विभाग अर्थव्यवस्थेत आहे तोपर्यंत नव्याने ठेवी मिळविण्याचे यत्न चालूच असतात. अलीकडे काही सुस्थिर खाजगी कंपन्यांनी आकर्षक अटींवर ठेवी घेण्याच्या घोषणा केल्या आहेत; त्यामुळे ठेवी ठेवणाऱ्या वर्गात पैसे गुंतविण्याच्या ह्या प्रकाराबद्दल नवी आस्था उत्पन्न होऊ पाहात आहे. एकंदरीने खाजगी मालकीच्या कंपन्यांचा कल व्याजाचा दर वाढविण्याकडे दिसून येत आहे. काही प्रसिद्ध कंपन्या पूर्वी दरसाल दरशेकडा ८ ते ९ टक्के व्याजाने ठेवी घेत असत. आता त्याच कंपन्या १० ते ११ टक्के व्याज देऊ करीत आहेत. केवळ व्याजाचे दरच वाढवून कंपन्या थांबलेल्या नाहीत. ठेवीदारांना आकर्षित करण्यासाठी इतर सवलतीही त्या देऊ करीत आहेत. सामान्यतः ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनी देण्याची प्रथा आहे. ही प्रथा सोडून काही कंपन्या दर तीन महिन्यांनी व्याज देण्यास तयार आहेत. अशा पद्धतीने व्याज देऊ केल्यास खर्च वाढतो; तरीही त्याची पर्वा करण्यात येत नाही. रिझर्व्ह बँकेने ह्यासंबंधी केलेल्या नियमाप्रमाणे ठेवीची मुदत किमान १ वर्षाची तरी असावयास पाहिजे. म्हणून तीन महिन्यांनी व्याज देण्याचे बंधन असलेल्या वार्षिक ठेवीवर व्याजाचा दर ९·५० टक्के ठेवण्यात आलेला दिसून येतो.

पण ह्याही पुढे जाऊन काही कंपन्यांनी ठेवीवरील व्याज दरमहा देण्याचीही तयारी दाखविली आहे. त्यांनी व्याजाचा दर १० टक्के ठेवला असला तरी हा दर १५ हजार रुपये अगर अधिक रकमेच्या ठेवींनाच लागू होणार आहे. ठेवीवरील व्याज मासिक पद्धतीने देण्यास बँकांनी प्रारंभ केलेला आहे. आता खाजगी मालकीच्या कंपन्यांनी हीच पद्धत सुरू करण्याची तयारी दाखवून बँकिंग कंपन्यांशी एक प्रकारे स्पर्धाच चालू केली आहे असे म्हणावयास हरकत नाही. खाजगी कंपन्यांनी देऊ केलेले व्याजाचे दर बरेच अधिक असल्याने एरव्ही बँकांच्या खजिन्यात जाणारा पैसा कंपन्यांकडे आकृष्ट होऊ लागल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. खाजगी कंपन्यांना ठेवीवरील व्याजाचे दर वाढवूनही धंदा करणे परवडते. कारण बँकांनी त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याजाचे दर वेळोवेळी वाढवून ११ टक्क्यापर्यंत आणले आहेत. दर इतके वाढल्याने खाजगी कंपन्यांना कायदेशीर मर्यादेत राहूनही लोकांकडून ठेवी घेणे लाभदायक ठरते. प्रसिद्ध कंपन्या लोकांकडून ठेवी घेण्यास उत्सुकता का दाखवीत आहेत? रिझर्व्ह बँकेने गेल्या नोव्हेंबर १६ पासून बँकांनी द्यावयाच्या कर्जावर निर्बंध घातल्याने खाजगी कंपन्या ठेवीच्या पैशाकडे अधिक प्रमाणात वळू लागल्या आहेत. ह्या परिस्थितीचा परिणाम म्हणून बँकांकडे येणाऱ्या मुदतबंद ठेवींच्या प्रमाणात बरीच घट होऊ लागली आहे. इतकेच काय पण बँकांकडे असणाऱ्या मुदतबंद ठेवींच्या रकमेत हळुहळू घट होण्याची शक्यताही नजरेआड करून चालणार नाही.

---

## सार्वजनिक मालकीच्या कारखान्यातील उत्पादनवाढ

मध्यवर्ती सरकारच्या अवजड उद्योग खात्याचे मंत्री श्री. टी. ए. पै ह्यांनी एंजिनिअरिंग असोसिएशन ऑफ इंडिआ ह्या संघटनेच्या वार्षिक सभेत बोलताना अशी माहिती दिली की, सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांपैकी १४ कारखान्यांनी आपल्या उत्पादनात वाढ केली आहे. १९७३–७४ सालाच्या पहिल्या ११ महिन्यांत ह्या कारखान्यांनी उत्पादनात ५० टक्के वाढ करण्यात यश मिळविले आहे. एप्रिल १९७३ पासून फेब्रुआरी १९७४ पर्यंतच्या कालात त्यांच्या एकूण उत्पादनाची किंमत ३३७ कोटी रुपये होती. तुलनात्मक दृष्टीने पाहाता एप्रिल १९७२ पासून फेब्रुआरी १९७३ पर्यंतच्या काळात उत्पादनाची किंमत २२५ कोटी रुपये होती. म्हणजे उत्पादनात ५० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसते. ह्यावरून असे दिसते की उद्योगधंद्यांची उत्पादनक्षमता अधिक योग्य रीतीने वापरण्यात आली तर उत्पादनात वाढ होणे शक्य आहे. तेलाच्या टंचाईमुळे उत्पन्न झालेल्या परिस्थितीने उद्योगधंद्यांच्या विकासात विस्कटीतपणा आलेला आहे ही गोष्ट खरी आहे. अर्थातच ह्या परिस्थितीशी जमवून घेताना निर्णय झटपट घेऊन त्यांची अमलबजावणी करण्यात आली पाहिजे. सध्या भारताच्या निर्यात व्यापारात तेजीचे वातावरण आहे. परंतु ही तेजी फार टिकेल असा समज करून घेऊन चालणार नाही. पश्चिम युरोप आणि अमेरिका ह्या देशांत जर मंदीची लाट पसरली तर तेजीला ओहोटी लागण्याचा संभव दृष्टीआड करून चालणार नाही. ह्या संभाव्य संकटाला तोंड देण्यासाठी त्याच्या परिणामांचा बारकाईने विचार करण्यात आला पाहिजे; आणि तोही लवकर.

### महागाई दरसाल किती % ने वाढत गेली

वार्षिक सरासरी % चे आकडे

| | १९६०–७० | १९७०–७३ |
|---|---|---|
| आइसलंड | ११·८ | १३·५ |
| स्पेन | ६·० | ९·९ |
| डेन्मार्क | ५·९ | ८·० |
| आयर्लंड | ४·८ | ९·४ |
| नॉर्वे | ४·५ | ६·८ |
| हॉलंड | ४·३ | ७·५ |
| ब्रिटन | ४·१ | ८·७ |
| फ्रान्स | ४·० | ६·६ |
| स्वीडन | ४·० | ६·८ |
| अमेरिका | २·८ | ५·१ |
| कॅनडा | २·७ | ५·६ |
| मेक्सिको | २·५ | ८·९ |
| ब्राझील | ४३·६ | १८·२ |
| चिली | २६·७ | १६७·७ |
| युराग्वे | २४·६ | ५७·० |
| कोलंबिया | ११·४ | १६·६ |
| पेरू | ९·७ | ९·३ |
| कोरिया | १४·० | ९·९ |
| भारत | ७·२ | १०·८ |
| जपान | ५·८ | ९·० |
| पाकिस्तान | ४·१ | १३·० |
| तैयान | २·९ | १०·९ |
| श्रीलंका | २·९ | ७·० |
| मलेशिया | ०·६ | ४·६ |
| इस्राएल | ५·३ | १६·६ |
| इराण | १·८ | ८·३ |

### चलनवाढ आणि महागाई — मार्ग सापडत नाही.

चलनवाढ आणि महागाई ही एक जागतिक समस्या आहे. कुठलाही देश — विकसित, अविकसित, श्रीमंत, गरीब, त्यांतून सुटलेला नाही. भारतात पोलाद, कोळसा, खते, इत्यादींच्या तुटवड्यामुळे औद्योगिक कच्च्या मालाच्या किमती भरमसाट वाढत आहेत. त्यांच्या घाऊक किमतींचा निर्देशांक (१९६१–६२ = १००) डिसेंबर, १९७२ मध्ये २१६·४ होता, तो डिसेंबर १९७३ मध्ये ३१३·५ वर गेला! म्हणजे त्यात जवळ जवळ १००% वाढ झाली! अन्नपदार्थांचा निर्देशांक डिसेंबर, १९७२ मध्ये २४२·९ होता तो डिसेंबर, १९७३ मध्ये ३०७·२ वर गेला. १९६५–६६ मध्ये तो फक्त १५०·३ होता.

ह्या महागाईमुळे गरिबांचे हाल होत आहेत आणि तूट भरून काढण्यासाठी होणाऱ्या नव्या नोटांच्या छपाईला दोष दिला जात आहे. १९७२–७३ मध्ये तुटीच्या अर्थव्यवस्थेच्या मार्गे म्हणजे नोटा छापून मध्यवर्ती सरकारने ८३८ कोटी रु. चे चलन उपलब्ध केले; ह्या काळात विकास योजनांवर फक्त ९२५ कोटी रु. खर्च झाला. १९७३–७४ मध्ये तो खर्च आणखी कमीच होईल, पण नोटा छापून खर्च भागविणे थांबेल का? उत्पादनवाढ, सरकारी खर्चात काटकसर, ह्यांवर भर न देता लोकांच्या अस्वास्थ्याच्या आविष्काराला थांबविता येणे कसे शक्य होणार?

### विजेच्या टंचाईचा धोका टळला नाही

भारतातील विजेचा पुरवठा अजून कित्येक वर्षे मागणीमागे रेंगाळणार आहे. म्हणजे नैसर्गिक साधनांचा शक्य तो उपयोग करूनही हा धोका शिल्लक राहतोच; त्यातच जलविद्युत निर्माण करणाऱ्या उत्तर भारतामधील केंद्रांना यंदा नवाच धोका उत्पन्न झाल्याचे दिसते. हिमालयाच्या पश्चिम भागात ह्या वर्षीच्या हिवाळ्यात नेहमीसारखा बर्फाचा वर्षाव झाला नाही. त्याचे परिणाम उन्हाळ्यात दिसू लागण्याची शक्यता आहे. उत्तर भारतामधील अनेक राज्यांना भाक्रा धरणावर उत्पन्न करण्यात येणाऱ्या विजेचा पुरवठा करण्यात येतो. अपुरे बर्फ पडल्यामुळे ह्या धरणातील पाण्याच्या साठ्याची उंची १९७२ च्या मानाने ५ फूट कमी झालेली आहे. अर्थातच त्याचा परिणाम विजेच्या निर्मितीवर होणार आहे. हिमाचल प्रदेश आणि पश्चिम उत्तर प्रदेश ह्या भागात ह्या वर्षी हिवाळी पाऊसही बेताचाच झाला आहे. तथापि ह्या परिस्थितीचा परिणाम निरनिराळ्या धरणातील पाण्यावर कसा व कितपत झाला आहे ते मे महिन्यात समजू शकेल. मे महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यानंतर हिमालयातील बर्फ वितळून त्याचे पाणी धरणात व नद्यात येऊ लागते. तत्पूर्वी पावसाळ्यात पडलेल्या पाण्याचा विजेच्या निर्मितीसाठी उपयोग करण्यात येऊन धरणातील पाण्याची पातळी खाली गेलेली असते. जलविद्युत निर्मिती केंद्रांतून विजेचे उत्पादन कमी होऊ लागले तर औष्णिक निर्मिती केंद्रांवर अधिक जबाबदारी पडेल. उत्तर भारतात अशी अनेक केंद्रे उभारण्यात येत आहेत. परंतु त्यांची उभारणी वेळेवर होऊन ती उत्पादनक्षम झाली पाहिजे. ह्या केंद्रांतून जास्तीत जास्त विजेचे उत्पादन होण्यासाठी त्यांना दगडी कोळशाचा पुरवठा भरपूर व नियमित झाला पाहिजे. म्हणजे विजेच्या निर्मितीच्या बाबतीत अज्ञात धागेदोरे फार आहेत.

**जगातील सर्वांत मोठा विमानतळ** — पॅरिसच्या वायव्येस १६ मैलांवरील रॉइसी-एन-फ्रान्स ह्या गावाजवळ चार्लस डि गॉल विमानतळाचे उद्घाटन मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात झाले. हा जगातील सर्वांत मोठा विमानतळ आहे. त्याला सुमारे ३०० कोटी रु. खर्च आला. दररोज १,००० म्हणजे प्रत्येक ९० सेकंदास एक विमान तेथे ये-जा करू शकेल. चालू वर्षी त्या विमानतळातून ४० लक्ष उतारूंची ये-जा होईल. आणखी १८ वर्षांनी हा आकडा १ कोटीच्या वर जाईल.

# कामाची जबाबदारी व अधिकार दोहोंचे वाटप करा

**सांगकाम्यांचे जबाबदार अधिकाऱ्यात रूपांतर**

(सु. वि. मेहेंदळे बी. ई., एम. बी. ए.)

मे० टू लिटल कंपनीचे जनरल मॅनेजर मि. सर्वाधिकारी हे मेंदूतील रक्तस्रावाने अचानक वारल्यावर त्या कंपनीचा व्यवहार एकदम थंड पडायची वेळ आली. टू लिटल ही कंपनी एका विख्यात उद्योगसमूहाची छोटीशी उपशाखा होती. याच समूहाच्या काही उत्पादनांची विक्री व सेवा या कंपनीतर्फे पाहिली जात असे. सर्वाधिकारी हे तेथील एकमेव वरिष्ठ अधिकारी होते. तेथील सर्व बारीकसारीक गोष्टी त्यांच्या सल्ल्याने व हुकुमानेच होत असत. कंपनीचा इतर सर्व कर्मचारी वर्ग हा दुय्यम किंवा तिय्यम दर्जाचा होता. अशा हुकूमशाही पद्धतीने चालणाऱ्या कंपनीचा कारभार थंड पडला नाही तरच नवल ! सर्वाधिकारींच्या मृत्युदिनानंतर दुसरे दिवशी ऑफीस उघडायला किल्ली आणण्यासाठी जेव्हा कंपनीचा शिपाई त्यांच्या बंगल्यावर गेला तेव्हा तेथील मंडळींना ते किल्ली कोठे ठेवीत असत हेही माहीत नव्हते. कंपनीच्या कर्मचाऱ्यांची तर खात्री झाली की आता ही कंपनी चालणार नाही व आपल्या सगळ्यांची नोकरी सुटल्यातच जमा आहे. कंपनीचे बँकेतील खातेही फक्त सर्वाधिकारी यांच्याच सहीने उघडले होते.

सर्वाधिकारी यांच्या मृत्यूनंतर तीन दिवस ऑफीस बंदच राहिले. चौथ्या दिवशीही कोणी नेमके काय काम करायचे हे ठरलेले नसल्याने ऑफीसात केवळ कर्तव्य म्हणूनच सर्व कर्मचारी वर्ग हजर झाला. प्रवेशद्वाराशी येताच त्यांना तेथील रिसेप्शनिस्टकडून कळले की मोठ्या ऑफीसकडून श्री. सुधारे नावाचे तरुण अधिकारी आले आहेत आणि त्यांनी कै. सर्वाधिकारी यांच्या केबिनचा ताबा घेतला आहे.

सुमारे ३० मिनिटांनी कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांना श्री. सुधारे यांनी सभेला बोलावले. कै. सर्वाधिकारी यांच्याविषयी थोडक्या शब्दांत दुखवटा व्यक्त करून श्री. सुधारे यांनी सांगितले, 'मला तुमच्याशी व्यक्तिशः बोलायचे आहे. तरी प्रत्येकाने आपण काय काम करतो ? कोणाकडून आदेश घेतो ? कोणाकडून काम करवून घेतो ? आपली येथील नेमकी जबाबदारी काय ? अधिकार काय ? वगैरेंसंबंधी एक नोट तयार ठेवावी. भेटीच्या अगोदर ती नोट वाचून मग मला तुमच्याशी तुमच्या कामाबद्दल अधिक चर्चा करता येईल. कामाचे स्वरूप व पद्धती समजावून घेता येतील.'

जेवणाचे सुटीनंतर श्री. सुधारे यांनी त्यांच्या सेक्रेटरीकडे असे किती कागद आले ते मागितले. तेव्हा सेक्रेटरीने लांब चेहरा करून सांगितले, "सर ! तुम्ही मागितलेल्या प्रश्नांची उत्तरेच कोणाला देता येणार नाहीत. तुमचे प्रश्नच त्यांना नीट समजलेले नाहीत. येथे सर्वजण कामासंबंधी कै. सर्वाधिकारी यांनाच रिपोर्ट करीत असत. त्यांच्याकडूनच सूचना व ऑर्डर्स घेत असत. येथल्या प्रत्येक पत्रव्यवहारावर मग ती मोठी विक्रीची ऑर्डर स्वीकारणे असो किंवा ऑफीसची रद्दी विकल्याची पावती असो, त्यावर कै. सर्वाधिकारी यांचीच सही असे. ऑफीसची प्रत्येक फाईल, टपालातील प्रत्येक पत्र स्वतः वाचून सर्वाधिकारीसाहेब त्यावर कामाच्या सूचना देत; इतरांचे काम स्वतः तपासीत. ते ऑफीस सुरू होण्याच्या आधी २ तास येत व नंतर ३ तासांनी जात. बंगल्यावरही रोज फाइली जात असत. अशा परिस्थितीत येथील लोकांना त्यांचे काम, अधिकार, जबाबदारी, यांची काहीच नीटशी कल्पना नाही. त्यामुळे ते तुम्हाला हवी ती माहिती देण्यास असमर्थ आहेत. जेवणाच्या सुटीत सगळे माझ्याकडे येऊन तसे सांगून गेले. त्यांच्यातर्फे मीच तुम्हाला लेखी निवेदन द्यावे अशी त्यांची सूचना होती. कारण आजपर्यंत त्यांनी पगारपत्रक व हजेरीपत्रक याशिवाय कोणत्याही कागदावर येथे सहीसुद्धा केलेली नाही." यापुढे कोणत्या परिस्थितीला तोंड द्यायचे आहे हे श्री. सुधारे यांच्या लक्षात आले आणि त्यांनी मनाशी निर्धार करून याही परिस्थितीतून मार्ग काढून टू लिटल कंपनी आधुनिक पद्धतीने सुधारण्याचा कार्यक्रम आखला. सुमारे ६ महिन्यांनी श्री. सुधारे यांनी स्वतःच एका मॅनेजमेंट सेमिनारमध्ये आपण टू लिटल कशी पुढे आणली यावर एक भाषण दिले. त्याचा गोषवारा पुढीलप्रमाणे :—

माझे टू लिटलचे सहकारी व कनिष्ठ कर्मचारी हे वरिष्ठ अधिकाऱ्याविषयी असीम आदर व निष्ठा बाळगणारे आहेत हे मी प्रथम लक्षात घेतले. त्यांच्या मदतीनेच कै. सर्वाधिकारी काम पाहात होते. पण कामात निर्णय घेण्याचा व काम पुरे झाल्यावर त्याचे श्रेय घेण्याचा प्रसंग त्यांचेवर कधीच आला नव्हता. रोजच्या टपालातील सुमारे ७० %पत्रे नेहमीच्या कामात ज्या पद्धती ठरल्या आहेत वा निर्णय यापूर्वी दिले गेले आहेत त्या स्वरूपाची असतात. मी तशी पत्रे सही न करताच परस्पर दुय्यम अधिकाऱ्यांकडे निर्णयासाठी व उत्तरासाठी पाठवू लागलो. त्यांनी स्वतःच्या सहीनेच उत्तरे पाठवायची त्यांना सूचना दिली. फक्त सुरुवातीला पत्र टपालात पडण्यापूर्वी मी नजरेखालून घालू लागलो. जर विशेष चूक नसेल तर ते तसेच जाऊ लागले. काही दिवसांनी या नित्याच्या पत्रव्यवहाराकडे मी दुर्लक्ष केले. त्यांतून जर काही पेचप्रसंग निर्माण झाला किंवा गिऱ्हाइकाची गंभीर तक्रार आली तरच मी त्या फाइली मागवू लागलो.

पूर्वीचा पत्रव्यवहार सर्वाधिकारी स्वतः तपासीत असल्याने व्याकरणाच्या चुका होत नसत व भाषा एका ठराविक पद्धतीचीच वापरली जाई. आता नवीन नवीन पत्रव्यवहार-पद्धतींचा उपयोग आमचे अधिकारी करू लागले. स्वतःच्या सहीने पत्र जाणार म्हणून अधिक दक्षतेने उत्तराचे ड्राफ्ट लिहू लागले. इतरांशी त्यासंबंधी चर्चा करू लागले. प्रसंगी माझ्याकडे येऊन

अडचणींचे निवारण करवून घेऊ लागले. यांपैकी दोघांचे इंग्रजी अगदी भिकार होते त्यांना मी बोलावून समज दिली की त्यांनी एखाद्या संध्याकाळच्या क्लासला जाऊन इंग्रजी पत्रव्यवहाराची कला अवगत करून घ्यावी, अन्यथा त्यांना कमी करावे लागेल. आश्चर्य म्हणजे तीन महिन्यांत आमच्या स्टेनोच्याच मार्गदर्शनाखाली ते मला पसंत पडेल इतपत इंग्लिश शिकून तयार झाले.

आमचे विक्री-अधिकारी नुसते खुर्चीवर बसून आलेल्या पत्रांना ठराविक ढंगाची उत्तरे पाठवीत असत. कंपनीची विक्री वाढावी म्हणून मी त्यांना वार्षिक बजेट करायला लावले. त्यासाठी मार्केटची पाहणी करण्यास त्यांना उत्तेजन दिले. त्यांचेतर्फे आमचे विक्रीप्रतिनिधी निरनिराळ्या बाजारपेठांची माहिती घेऊन आले. यापुढे कोणतीही नवी ऑर्डर स्वीकारताना आमच्या विक्री-अधिकाऱ्यांनी गिऱ्हाइकाशी प्रथम बोलणी करून त्यांचे जे म्हणणे असेल ते मला येऊन सांगायचे ही प्रथा पाडली. साहजिकच माझ्या दाराशी जमणारी गिऱ्हाइकांची गर्दी कमी झाली. आमच्या अधिकाऱ्यांना गिऱ्हाईक मान देऊ लागले. या अधिकाऱ्यांना विक्रीवर उत्तेजनात्मक बक्षिसे ठेवल्याने ते अधिक काळजीपूर्वक काम पाहू लागले. प्रसंगी ज्या अटींवर मी ऑर्डर स्वीकारली असती त्यापेक्षा जास्त आकर्षक अटींवर ते व्यवहार पुरा करू लागले. मला एकट्याला इतक्या थोड्या वेळात एवढी गिऱ्हाइके समजून घेणे, त्यांचे व्यवहार संभाळणे, एरव्ही शक्य झालेच नसते.

आमच्या साप्ताहिक सभेत आमचे हे अधिकारी आपल्याला आलेले अनुभव जेव्हा सांगू लागले तेव्हा इतकी वर्षे सांगकामे असलेली ही माणसे एवढ्या जबाबदारीने निर्णय घेऊ शकतात हे त्यांच्याच सहकाऱ्यांना खरे वाटत नसे. आज माझे अधिकारी हे माझी बरीचशी कामाची जबाबदारी उचलतात व त्यांना ती जबाबदारी पार पाडता यावी म्हणून लागणारे अधिकार मी मोकळेपणाने दिलेले आहेत. प्रत्येकाला त्याच्या कामात रस घेता यावा म्हणून प्रोत्साहन आहे. अडचणीचे वेळी फक्त त्यांनी माझा सल्ला घेऊन मग निर्णय घ्यावा एवढीच माझी अपेक्षा आहे. त्यांच्या चुकांबद्दल मी त्यांच्याशी चर्चा करतो. पुन्हा अशी चूक होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी अशी योग्य ती समज देतो. त्यांच्या चांगल्या कामाचे इतर अधिकाऱ्यांसमोर कौतुक करतो. त्यामुळे त्यांनाही आवश्यक ते प्रोत्साहन मिळते. या अधिकाऱ्यांनी त्यांच्या कामाचे पुन्हा वाटप करावे व कनिष्ठ थरातील माणसांपर्यंत प्रत्येकाकडून जबाबदारीने काम उरकून कसे घ्यावे यासंबंधी चर्चा करतो. आज मला अशी खात्री वाटते की आणखी वर्षाने मी जरी डू लिटिलमधून बाहेर पडलो तरी ती कंपनी खूप काम करू शकेल. माझ्या जाण्याने तेथे पोकळी निर्माण होणार नाही. काम उरकण्याच्या व कामासाठी वेळ देण्याच्या प्रत्येकाला मर्यादा आहेत. कामाचे वाटप करून त्याची जबाबदारी व तसे अधिकार योग्य त्या व्यक्तींना दिल्यास एकूण कामाचा उरक लवकर लागेल व थोडक्या वेळात अधिक कामाचे निकाल हाती येतील. या पद्धतीने काम उरकले तरच या चढाओढीच्या जगात कंपन्यांचा निभाव लागेल.

---

## एडनमधील हिंदी लोक परतले

एडनमध्ये राहात असलेल्या सुमारे १६ हजार हिंदी नागरिकांपैकी बहुतेक नागरिक आता परत आले आहेत. त्यांनी आपली मालमत्ता सोडून दिली आहे. कारण परदेशातून येणाऱ्या लोकांबद्दलचे कायदे आता अधिक त्रासदायक झाले आहेत. १९६९ मध्ये एडनच्या सरकारने हिंदी स्थलांतरितांचे परवाने रद्द केले आणि त्यांना देशात राहण्यासाठी पुन्हा अर्ज करण्यास सांगितले. बहुतेक सर्व हिंदी लोकांनी असे अर्ज केले पण त्यांना राहण्याचे परवाने मात्र देण्यात आले नाहीत. अर्जासोबत त्यांनी आपल्या वास्तव्यासंबंधी योग्य ते कागदोपत्री पुरावे हुकमाप्रमाणे दिले होते. सध्या एडनमध्ये कामासाठी आलेले १६० परवानेदारच काय ते आहेत. हिंदी कंपन्यांनी व व्यापारी संघटनांनी मागे ठेवलेल्या मालमत्तेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले आहे. बेवारशी मालमत्ता म्हणून त्यांची नोंद करण्यात आली होती. कोणाही हिंदी माणसाला अद्यापपर्यंत नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही.

---

## प्राप्तिकर भरणारांपैकी चार लक्ष लोकांची सुटका

१९७४–७५ सालाच्या मध्यवर्ती अंदाजपत्रकात प्राप्तिकर-पद्धतीत बदल करण्यात आले आहेत. दरसाल ६ हजार रुपये उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीला प्राप्तिकर भरण्यापासून मुक्त करण्यात आले आहे. त्याशिवाय पगार व वेतनाचे रूपाने उत्पन्न मिळविणारांच्या बाबतीत कर आकारण्याची पद्धतही सुटसुटीत करण्यात आली आहे. त्याचा परिणाम प्राप्तिकर खात्यावरील कामाचा ताण कमी होण्यात होईल. खात्याकडील सुमारे १० लाख प्रकरणे कमी होतील असा अंदाज करण्यात आला आहे. त्यामुळे २०० प्राप्तिकर अधिकारी आपले काम अधिक चोखपणे करू शकतील. बड्या प्राप्तिकरदात्यांवर त्यांना अधिक लक्ष केंद्रित करता येईल. शिवाय उत्पन्नाच्या उगमाच्या ठिकाणीच प्राप्तिकर वसूल करण्याचे नियम अधिक दक्षतेने अमलात आणणे सोपे जाईल. सुमारे ४ लाख प्राप्तिकर भरणारे आता मुक्त होतील.

---

**भारतातून गोमांसाची निर्यात** — गोहत्येवरील निर्बंध नष्ट करून गोमांसाच्या निर्यातीसाठी संघटना उभारण्याचा भारत सरकार विचार करीत आहे, असे वृत्त 'न्यूज वीक' ह्या अमेरिकन साप्ताहिकाने प्रसिद्ध केले आहे. अरबी राज्यांत प्रथिनांचा तुटवडा आहे, तेथे गोमांसाला मोठी मागणी आहे. युरोपातील सूप करणाऱ्यांना 'लीन बीफ' हवे असते; त्यांनाही भारतातील अर्धपोटी गायींचे मांस उपयुक्त वाटेल.

## चोरी पचविण्याइतके मोठे व्हा !

महाराष्ट्राचे राज्यपाल अलियावर जंग ह्यांनी ३१ जानेवारी, १९७४ रोजी मुंबई येथे पाचव्या नॅशनल बुक फेअरचे उद्‌घाटन केले. त्या वेळी ते म्हणाले, 'माझ्या तरुणपणी मला पुस्तके चोरण्याची सवय होती. माझा प्रचंड ग्रंथसंग्रह त्यातूनच निर्माण झाला आहे. मला हवी ती सर्व पुस्तके चोरीच्या मार्गे मिळू शकली नाहीत, त्यामुळे काही पुस्तके विकत घेणे मला नाइलाजाने भाग पडले." राज्यपालांच्या ह्या जाहीर कबुलीने उपस्थितांना आश्चर्याचा धक्काच दिला. राज्यपालांच्या वक्तव्यात विनोदाच्या भागापेक्षा सत्याचा भाग अधिक असावा, असेच उपस्थितांना वाटले असावे.

व्यवहारी जगात यशस्वी ठरलेल्या वृद्धांच्या पूर्वचरित्राची चौकशी न केलेलीच बरी. कोण कसा मोठा झाला, हे अज्ञात राहिलेलेच बरे. कॉपी करून वरचा नंबर मिळविलेले पण आता विद्वान म्हणून गणले जाणारे काय कमी आहेत ? शिक्षणासाठी परदेशी जाण्यासाठी संस्थांचे कर्ज घेणारे परत आल्यावर समाजात मानाने वावरतात, शिक्षणसंस्थांची अध्यक्षपदे भूषवितात, परंतु ज्या कर्जाच्या आधाराने ते मोठे झाले त्याची फेड मात्र करीत नाहीत, असे कित्येकांच्या बाबतीत घडते. बायाबापड्यांचे पैसे हिरावून घेऊन गबर झालेले लोक लोकांना नीतीची प्रवचने देत सुटतात. मोठमोठ्या देणग्या देणारे दानशूर कोणत्या कारवायांनी श्रीमंत झालेले असतात, त्याची चौकशी कशाला करायची ? समाजसेवेसाठी पुढे येणाऱ्यांच्या स्वतःच्या खाजगी जीवनाची माहिती कशाला करून घ्यायची ? लोकांच्या प्रतिमेला डाग लावून कुणाचा फायदा होणार ?

तथापि, वस्तुस्थितीच्या मानाने भलते श्रेय कुणाला मिळू लागले, तर त्याची प्रतिक्रिया होणे अपरिहार्य आहे. ह्या दृष्टीने 'उत्तररामचरितम्' मधील सुमन्त्र, चन्द्रकेतू आणि लव ह्यांचे-मधील संवाद अत्यंत उद्‌बोधक आहे. सुमन्त्र आणि चन्द्रकेतू ह्यांनी रघुपती रामाच्या शौर्याचा महिमा सांगितला, त्यावर लव म्हणतो, "रघुपतीचे चरित्र आणि त्याचा महिमा कुणास माहीत नाही ? ह्याविषयी काही मला बोलता येईल, पण कशाला गाल-बोट लावायचे ? वृद्धास्ते न विचारणीय चरिता:। —वृद्धांच्या चारित्र्याची छाननी करायची नसते. स्त्रीशी युद्ध करण्यास क्षत्रियाला प्रतिबंध आहे, तरीसुद्धा रामाने सुन्दाच्या पत्नीला ठार केले. खर राक्षसाशी युद्ध करतेवेळी रामाने तीन पावले माघार घेतली हे क्षत्रियाला शोभणारे नव्हते. वाली सुग्रीवाशी लढण्यात गुंतला असताना रामाने वालीचा बाणाने वध केला. रामाच्या क्षत्रियत्वाला ह्या तीनही प्रमाणांनी बाध येत नाही; उलट आदर्श क्षत्रिय म्हणून त्याची कीर्ती पसरलेली आहे. हे सर्व कशाला उगाळायचे ?"

प्रत्यक्ष रामचरिताची लवाने अभावितपणे केलेली ही संभावना; तेथे बुद्रुकांच्या पूर्वचरिताची कशाला चौकशी करायची ? पुणे विद्यापीठाचे कुलपति अलियावर जंग ह्यांनी दिलेल्या कबुली-जबाबाने काय सूचित केले आहे ?

चोरी पचविण्याइतके मोठे व्हा— !

—श्री. वा. काळे, 'वाङ्मय शोभा' एप्रिल, १९७४.

---

## इराणचा जागतिक महत्त्वाच्या राष्ट्रसमुच्चयात प्रवेश

जगाचे आतापर्यंत तीन भाग केले जात असत:—पहिले भांडवलदार, उद्योगप्रधान; दुसरे कम्युनिस्ट, उद्योगप्रधान; तिसरे अविकसित, दरिद्री. आता चवथे जग निर्माण होत आहे—अविकसित परंतु अति श्रीमान. तेलाच्या राजकारणातून हे जग निर्माण झाले असून ह्या जगाचे पुढारीपण इराणकडे येण्याचा रंग दिसत आहे. इराणजवळ नैसर्गिक संपत्ती खूप आहे, त्याच-बरोबर त्याचे प्रजाजनही हुशार आणि कामसू असून त्यांचे नेतृत्वही जबाबदार आणि दूरदर्शी धुरीणाच्या हाती आहे. इराण इतर सर्व देशांपेक्षा जास्त क्रूड तेल निर्गत करतो आणि त्याचा जमिनीखालील साठाही प्रचंड आहे. इराणचा शहा महंमद रेझा पेहलवी ह्याचेजवळ नेतृत्वाला आवश्यक ते सर्व गुण आहेत. काही वर्षांनी इराणला जगातील पहिल्या प्रतीच्या राष्ट्रात स्थान मिळू शकेल. केवळ आर्थिकच नव्हे तर शस्त्रास्त्रांच्या मार्गेही इराण प्रबळ होत आहे. तेलापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा बराच मोठा भाग जागतिक बँकेला आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला देण्यास इराण उत्सुक आहे. एक खास डेव्हलपमेंट फंड निर्माण करण्याची त्याची योजना आहे. तेल उत्पादन करणारे १२ देश आणि तेलाची आयात करणारे १२ देश ह्यांनी प्रत्येकी दरसाल १५ कोटी डॉलर्स द्यावे आणि विकसनशील देशांच्या १२ प्रतिनिधींसह त्यांनी त्या फंडाचा मागासलेल्या देशांच्या उद्धारासाठी विनियोग करावा अशी इराणची योजना आहे.

## मानसिक रोग्यांचा राष्ट्रव्यापी प्रश्न

बंगलोर येथे मानसोपचार करणाऱ्या शास्त्रज्ञांची परिषद भरविण्यात आली होती. त्यात अशी माहिती सांगण्यात आली की देशातील लोकसंख्येपैकी २ ते ३ टक्के लोक तीव्र स्वरूपाच्या मानसिक व्याधींनी पछाडलेले आहेत. त्यांची संख्या जवळजवळ ५० लाखांच्या घरात आहे. त्याशिवाय जवळजवळ तितकेच दुर्दैवी जीव मानसिक दृष्ट्या अविकसित राहिलेले आहेत. ५० लाख मानसिक रुग्णांना खरोखर इस्पितळात ठेवण्याची गरज आहे. परंतु सध्या फक्त १८ हजार रोग्यांनाच इस्पितळात दाखल करून घेता येणे शक्य आहे. त्यातच मानसोपचार शास्त्रज्ञांचाही तुटवडा आहे. देशात अवघे ३०० मानसोपचार तज्ज्ञ आहेत.

---

**मुंबईमधील इनकमटॅक्सची वसुली** — ३१ मार्च रोजी संपलेल्या वर्षी मुंबईमध्ये ४३५ कोटी रु. प्राप्तीवरील कर वसूल करण्यात आला. १९७२-७३ मधील वसुली ३८७ कोटी रु. ची होती. १९७० मध्ये ती फक्त २१२ कोटी रु. होती.

**सेंट्रल बँकेचे नवे चेअरमन** — सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे चेअरमन म्हणून मध्यवर्ती सरकारने श्री. डी. व्ही. तनेजा यांची एका वर्षासाठी नेमणूक केली आहे. श्री. बी. एन. आडारकर यांचे जागी ते येत आहेत.

**घड्याळांची चोरटी आयात** — १९७३ मध्ये भारतात १ कोटी, १३ लक्ष रु. किंमतीच्या घड्याळांची चोरटी आयात झाली. ही घड्याळेही अस्सल नसतात तर पुष्कळशा घड्याळांच्या तबकड्यांवर सुप्रसिद्ध कंपन्यांची (उदाहरणार्थ, सॅन्डोग, फाव्हरल्युबा, ओमिक्स) नावे कोरलेली असतात. हाँगकाँगमध्ये ही बनवेगिरी केली जाते. भारतात दरसाल सुमारे ६० लक्ष घड्याळांची चोरटी आयात होते.

**गर्भधारणेचा सत्वर शोध** — गर्भधारणा झाल्यापासून सहा दिवसांनी केव्हांही ती ओळखण्याची पद्धत न्यूयॉर्क हॉस्पिटल मेडिकल सेंटरच्या डॉ. ब्रिज नारायण ह्या डॉक्टरने आपल्या २० साहाय्यकांच्या मदतीने शोधून काढली आहे. बोटाच्या रक्ताचे काही थेंब काढून घेऊन त्यांची तपासणी करून गर्भधारणा ओळखता येते; त्याला एक तासाचा अवधी पुरतो. त्याला सुमारे ९० रु. खर्च येईल. हा शोध "रेडिओ रिसेप्टॉरसी टेस्ट" ह्या नावाने ओळखला जात आहे. त्या टेस्टचा उपयोग प्रचारात आला म्हणजे गर्भपात घडवून आणण्यासाठी थांबावे लागणार नाही आणि संतति प्रतिबंधाला नवी पद्धती उपलब्ध होईल.

**जपानी स्त्रिया मौंट एव्हरेस्टवर जाणार**—मौंट एव्हरेस्ट ह्या हिमालयाच्या शिखरावर जाण्याचा प्रयत्न जपानी गिर्यारोहक स्त्रियांचा एक संघ येत्या वर्षी करणार आहे. शिखरावर जाण्याचा मार्ग आणि हिमविषयक परिस्थिती ह्यांच्या अभ्यासासाठी चार स्त्री गिर्यारोहक खाटमंडूला आले आहेत.

**जप्त केलेली चोरटी आयात** — १९७३ मध्ये भारतात एकूण ३१ कोटी रुपये किमतीचा, चोरट्या मार्गे आलेला माल जप्त करण्यात आला. पूर्वीच्या वर्षापेक्षा ही रक्कम ५.५ कोटींनी जास्त आहे.

**एम्. ए. च्या खोट्या पदव्या** — कलकत्ता विद्यापीठाच्या खोट्या एम्. ए. च्या पदव्या कलकत्त्यामध्ये विकण्यात येत आहेत. पदवीपरीक्षेत मिळालेल्या गुणांचा दाखलाही त्यासोबत मिळतो. प्रत्येक दाखल्यासाठी ५०० रुपये द्यावे लागतात. ह्या बनावट पदव्या शाळांतील शिक्षक घेतात. कारण, त्यांना त्यामुळे दरमहा ७५ रुपये अधिक मिळतात.

**१०० रुपयाला शीतपेटिका** —अन्नपदार्थ ताजे ठेवून टिकविण्यासाठी शीतपेटिका वापरतात. पण विजेवर चालणाऱ्या शीतपेटिका महाग असतात. सामान्यांना त्या परवडत नाहीत. तामीळनाडूमधील एका इंजिनिअराने १०० रुपयांची शीतपेटिका बनविली आहे.

धनवर्धिनी परंपरेतील
४ नवीन योजना
कर्जहमी ठेव योजना
ठेव परतीचे वेळी तितकेच कर्ज मिळण्याची सुरवातीलाच हमी
विशेष सेव्हिंग्ज खाते
८.७५ टक्के व्याज, पैसे काढताना ९१ दिवसाची पूर्व सूचना.
मुदतीचे सेव्हिंग्ज खाते
७.२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे
मासिक व्याज ठेव योजना
किमान १००० रु. (अथवा त्याच्या पटीत)
कमीत कमी ९ वर्ष मुदत.
युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन
एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील
भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

## टेलिव्हिजनवरील दृश्यांपासून धोका

भारतात आता टेलिव्हिजनचे युग सुरू झाले आहे. जनमानसापर्यंत पोचण्याचे एक अत्यंत प्रभावी साधन म्हणून ते गणले जाते. शैक्षणिक प्रसाराच्या बाबतीत तर त्याला तोडच नाही असे म्हणता येईल. दूरचित्रवाणीवरील दृश्याने अमेरिकेसारख्या देशांतून गुन्हेगारीचा प्रसार झाल्याचे सांगण्यात येते. पण हा दोष चित्रवाणीचा नसून पडद्यावर गुन्हेगारीस उत्तेजन देणारी दृश्ये दाखविण्यात येतात त्याचा आहे. चित्रवाणीच्या पडद्यावर न दाखविण्यासारखी दृश्ये दाखविण्याचे समजा उद्या बंद करण्यात आले, तरीसुद्धा चित्रवाणी धोक्याची ठरण्याची शक्यता पश्चिम जर्मनीतील एका सामाजिक संशोधन संस्थेच्या तपासणीवरून दिसून येते. पडद्यावर हॉकी–फुटबॉलचे सामने दाखविण्यात येतात. परंतु ते पाहाताना पाहाणाऱ्याच्या हृदयावर अतिशय ताण पडतो. हा ताण एखादी गुप्तपोलिसकथा पडद्यावर दाखविली जात असताना हृदयावर पडणाऱ्या ताणापेक्षाही अधिक असतो असा निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे. सामान्यपणे माणसाच्या नाडीचे ठोके दर मिनिटाला ८० ते ८५ पर्यंत पडतात. संशोधकांनी पडद्यावर फुटबॉलचा सामना पाहात असणारांची नाडी तपासली असता नाडीचे ठोके दर मिनिटाला १२७ इतके वाढलेले आढळले. विशेषत: गोल होण्याच्या वेळाची दृश्ये अगर गोलकडे झपाट्याने धावणारे खेळाडू पाहाताना पाहाणारांच्या नाडीचे ठोके नेहमीपेक्षा ४५ पर्यंत अधिक पडतात असे दिसून आले. त्यामुळे पाहाणारांची रक्ताभिसरणाची गतीही वाढते. नेहमीच अशी दृश्ये पाहाण्याचे परिणाम धोक्याचे ठरण्याची शक्यता आहे.

---

## अमेरिकेत जाणाऱ्या डॉक्टरांच्या संख्येवर मर्यादा !

अविकसित देशांपुढे आज ज्या समस्या आहेत त्यांत शिक्षण घेऊन कुशल बनलेल्या शास्त्रज्ञांची व तंत्रज्ञांची कुचंबणा ही एक आहे. ह्या लोकांपैकी अनेकजण परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेऊन आलेले असतात. त्यांपैकी परत मायदेशी येणाऱ्यांना भारतात चांगल्या नौकऱ्या मिळतातच असे नाही. भारताच्या लोकसंख्येच्या मानाने डॉक्टर्सची संख्या अजूनही कमी आहे. त्यातही जे आहेत ते शहरातच दाटी करीत आहेत. परिणामी, देशाची आरोग्यसंघटना विस्कळीत झालेली आहे. शहरातही सर्वच डॉक्टरांना भरपूर पैसा मिळतो असे नाही. ह्या परिस्थितीचा विचार करून ज्यांना शक्य आहे ते डॉक्टर्स परदेशी विशेषत: इंग्लंड-अमेरिकेत जाऊन पैसा मिळविण्याच्या मागे लागतात. अमेरिकेत डॉक्टर्सना चांगले पैसे मिळतात. चांगला डॉक्टर अमेरिकेत एका वर्षात ३० हजार डॉलर्सपासून १ लाख डॉलर्सपर्यंत कमाई करू शकतो. भारतात ह्याच्या दशांशाइतके पैसे मिळविण्यासाठी कितीतरी वर्षे खर्ची घालावी लागतात. अशा परिस्थितीत भारतामधून अनेक डॉक्टर्स अमेरिकेला जाऊ लागल्यास नवल वाटण्याचे कारण नाही. पण ह्या बाबतीत भारत एकटा नाही. फिलिपाइन्स, दक्षिण कोरिआ इत्यादी देशांतूनही डॉक्टर्स अमेरिकेत जात आहेत. खुद्द अमेरिकेमधील वैद्यकीय संस्थांतून जितके डॉक्टर्स शिकून बाहेर पडत आहेत त्यांच्यापेक्षाही परदेशांतून आलेल्या डॉक्टर्सची संख्या अधिक होत चालली आहे. भारताचे आरोग्यमंत्री डॉ. करणसिंग ह्यांनी विनंति केल्यावरून भारतामधून जाणाऱ्या डॉक्टर्सच्या संख्येवर नियंत्रण घालण्याचा विचार अमेरिका करीत आहे.

---

## हिंदी चित्रपट पाहाण्यासाठी डाक्क्यात गर्दी

बांगला देशाच्या राजधानीत म्हणजे डाक्क्यात हिंदी चित्रपटांचा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. अशा महोत्सवाचा हा तेथील पहिलाच प्रसंग आहे. डाक्क्यातील बोलपट-रसिक ह्या संधीने वेडावून गेल्यासारखे झाले आहेत. शहरातील ७ सिनेमागृहांत बोलपट दाखविण्यात येत आहेत. अनेक चित्रगृहांवर तिकिटे आगाऊ राखून ठेवण्यासाठी गर्दी उसळली आहे. महोत्सवाचे संचालन करण्यासाठी मुंबईचे चित्रनिर्माते श्री. बी. आर. चोप्रा आणि भारत सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्याचा एक अधिकारी तिकडे गेले आहेत. ४ भाषांतील ७ हिंदी बोलपट दाखविण्यात येत आहेत. प्रत्येक चित्रपटगृहात रोज ४ खेळ दाखविण्यात येतात. डाक्क्यानंतर चितगाव, खुलना आणि राजशाही ह्या ठिकाणी चित्रपट दाखविले जातील.

---

## चीन अमेरिकेच्या गव्हाची खरेदी बंद करणार !

गेल्या वर्षी अमेरिकेने भारताला दिलेल्या अन्नधान्यात धतुऱ्याचे विषारी बियाणे सापडले. चीन अमेरिकेकडून ह्या वर्षी गहू खरेदी करीत आहे. परंतु ह्या गव्हातही काही प्रकारची बुरशी आढळून आली आहे. त्यामुळे चीन अमेरिकेकडून गहू घेण्याचे बंद करण्याची शक्यता आहे. चीनने अनेक बोटी बंदरातच थांबवून ठेवल्या आहेत. गव्हाची नीट तपासणी केल्याखेरीज तो बोटीवरून उतरवून घेण्यात येणार नाही. ह्या बुरशीचा प्रादुर्भाव चीनमध्ये होण्याची भीती चीनला वाटत आहे. कॅनडात गव्हाची तपासणी अधिक चांगली करतात. त्यामुळे ह्यापुढे कॅनडाकडून गहू घेण्याचा विचार चीन करीत आहे.

---

**इंग्रज पत्नीला वेड लागण्याची भीती**—"भारतातील राहणी इतकी भयानक आहे की मला तेथील उष्मा, रोगराई आणि दुर्भिक्ष ह्यात दिवस काढावे लागले तर मला वेड लागेल; भारतातील परिस्थिती आता अधिकच बिघडत चालली आहे." असे श्री. स्वरूप रॉय ह्यांची इंग्रज पत्नी डायना रॉय ह्यांनी ब्रिटिश कोर्टाला पटवून दिले आणि आपल्या भारतीय पतीला ब्रिटनमध्ये आणण्यास परवानगी मिळविली.

**स्वरणसिंगांच्या किसिंजरला शुभेच्छा**—डॉ. किसिंजर, अमेरिकन सेक्रेटरी ऑफ स्टेट, ह्यांच्या विवाहानिमित्त भारताचे परराष्ट्रमंत्री श्री. स्वरणसिंग ह्यांनी शुभेच्छा आणि हस्तकौशल्याच्या काही जिनसा भेटीदाखल पाठविल्या आहेत.



अध्यक्ष : श्री. वि. श्री. दामले

# युनायटेड वेस्टर्न बँकेच्या प्रगतीचा आढावा

## अध्यक्ष : श्री. वि. श्री. दामले ह्यांचे वार्षिक सभेतील भाषण

( अहवालाच्या वर्षी बँकेकडील ठेवीत ६३५ लक्ष रु. ची भर पडून ठेवी रु. २५ कोटींचे वर गेल्या. बँकेचे एकूण राखीव निधी वसूल भांडवलापेक्षा जास्त झाले आहेत. कर्जव्यवहारात ४०६ लक्ष रु. ची वाढ झाली. भाग भांडवलात रु. ५·८७ लाखांची भर पडूनही १० टक्के लाभांश कायम आहे. बँकेने ११ नवीन शाखा उघडून एकूण शाखांची संख्या ७२ झाली. )

रिझर्व्ह बँकेने बँकांच्या कर्जव्यवहार करण्याच्या क्षमतेवरील नियंत्रणे काढून घ्यावीत मात्र उत्पादनवाढीस आवश्यक नसलेला कर्जव्यवहार काही विशिष्ट पातळीवर पूर्णपणे गोठवून ठेवला जावा म्हणजे त्यामुळे जो जादा पैसा बँकांकडे उपलब्ध होईल, तो फक्त उत्पादनवाढीस आवश्यक असलेल्या कर्जव्यवहाराकरिताच वापरला जाईल.

चलनवाढीच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँकांच्या कर्जव्यवहाराबाबत अत्यंत कडक अशी काही नियंत्रणे घातलेली आहेत. ज्या उद्देशाने ही नियंत्रणे घातली गेलेली आहेत तो उद्देश स्वागतार्हच आहे. तरीदेखील त्या नियंत्रणाचा प्रत्यक्ष परिणाम उत्पादनवाढीस खीळ बसण्यात होणार नाही याबद्दल काळजी घेणे अत्यंत जरूर आहे.

अग्रक्रमाच्या क्षेत्राकडील कर्जव्यवहार व उत्पादनवाढीस आवश्यक असलेला कर्जव्यवहार बँकांना नाइलाजाने कमी करावा लागला आहे. कर्जव्यवहारावरील मार्जिन व व्याज-दर वाढविणे ही नियंत्रणे आवश्यक असून त्याबाबत बँकांनी तक्रार करण्याचे काहीच कारण नाही.

हिशेबात न दाखविल्या जाणाऱ्या पैशाची समस्या जटिल आहे. बँकांच्या कर्जव्यवहारावर बंधने घातली तरी देखील काळ्या पैशाचा उपयोग करून या बंधनामागचे उद्देश असफल केले जातात. काळा पैसा बाहेर काढणे आणि तो निर्माण होणार नाही असे पाहणे जरूर आहे. या प्रश्नावरचे उपाय सर्वांनाच माहीत आहेत. मात्र ते कटाक्षाने अमलात आणण्याचे धैर्य दाखविण्याची आवश्यकता आहे.





प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत. देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर

किर्लोस्कर एंजिन– शेतकऱ्याची पहिली पसंती

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315-M

## मोठ्या लिमिटेड कंपन्यांचे आर्थिक व्यवहार

### एप्रिल १९७२ ते मार्च १९७३

एक कोटी रुपयांपेक्षा अधिक वसूल भांडवल असलेल्या ३५० मोठ्या पब्लिक लिमिटेड कंपन्यांच्या हिशेबांची छाननी केली असता त्यांचे उत्पादन, विक्री, किफायतशीरपणा, जिंदगीमधील वाढ, इत्यादींची तुलनात्मक माहिती मिळते. ह्या कंपन्यांसंबंधीचे निष्कर्ष सर्व कंपन्यांचे बाबतीतही खरे ठरतील.

१९७१–७२ चे मानाने १९७२–७३ मध्ये उत्पादन ९.१%ने वाढले, (त्या पूर्वीच्या वर्षी वाढ ११.७% होती), विक्रीमध्ये १०.९% ने वाढ झाली (११.२%), करपूर्व नफ्यात ०.३% घट झाली (+२.९%) तरी दिलेले डिव्हिडंड जास्त असल्यामुळे कंपन्यात मुरविलेल्या नफ्यात २०.६% ने घट झाली (–९.४%). फिक्स्ड ॲसेट्समध्ये ८.५% वाढ झाली (९.७%).

खालील तक्त्यात हे तपशीलवार आकड्यांचे स्वरूपात दिलेले आहे :—

| | (आकडे कोटी रुपयांचे) | | |
|---|---|---|---|
| | १९७०–७१ | १९७१–७२ | १९७२–७३ |
| विक्री | ४,४९३ | ४,९९६ | ५,५३९ |
| उत्पादन | ४,५५२ | ५,०८३ | ५,५४८ |
| जमा | ४,६४२ | ५,१८३ | ५,६५७ |
| खर्च | ४,०९६ | ४,६०५ | ५,०६९ |
| ठोक नफा | ५४६ | ५७८ | ५८८ |
| दिलेले व्याज | १४३ | १६४ | १७५ |
| करासाठी तरतूद | १६१ | १८१ | १९३ |
| करानंतर नफा | २४२ | २३३ | २२० |
| डिव्हिडंड्स | ११८ | १२१ | १३१ |
| मुरविलेला नफा | १२४ | ११२ | ८९ |

### राज्य सरकारांना आर्थिक शिस्त नको

गेल्या महिन्यात अर्थमंत्र्यांनी राज्यसभेत बोलताना राज्य सरकारांना इशारा दिला होता की त्यांनी स्वतःच्या उत्पन्नामध्येच स्वतःचा खर्च भागविला पाहिजे; त्यांना पूर्वीप्रमाणे जादा ओव्हरड्राफ्टने पैसे मिळणार नाहीत पंजाब सरकारला ८ कोटी रुपयांचा ओव्हरड्राफ्ट मंजूर केलेला आहे, तरीसुद्धा ३१ मार्च अखेर त्या सरकारने ३७ कोटी रुपये ओव्हरड्राफ्टने मिळविले. ही रक्कम त्या सरकारने सत्वर परत करावी, नाहीतर त्याची बिले व चेक्स नापास केले जातील अशी ताकीद रिझर्व बँकेने दिली आहे. पंजाब सरकारच्या १९७४–७५ च्या बजेटात २१.९३ कोटी रु. च्या तुटीची व्यवस्था केलेलीच नाही. पंजाबप्रमाणे इतर राज्येही आर्थिक शिस्त पाळण्याच्या बाबतीत कसूर करीत असतात.

### परदेशांना मदत देण्यास अमेरिकेची नाराजी का ?

अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने परदेशांना देण्यात येणाऱ्या मदतीविषयी एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. ह्या पुस्तिकेत अमेरिकेत परदेशांना मदत देण्यासंबंधी नाराजी का आहे ते स्पष्टपणे सांगितले आहे. पुस्तिका म्हणते, अमेरिका परदेशांना मदत देत असली तरी तिचे असे काही हितसंबंध असतातच. अलिप्त देशांचा जो गट आहे त्याला अमेरिकेकडून मदत मिळते. पण अमेरिकेच्या हितसंबंधांना मात्र त्यांच्याकडून पाठिंबा मिळत नाही. त्यामुळे अर्थातच अमेरिका मदत देण्यास नाराज असते. अनेक अविकसित देश अमेरिकेच्या हितसंबंधांना अनुकूल अशी भूमिका घेत नाहीत. त्यांचे अलिप्तपणाचे धोरण अमेरिकेला सतत नडत असते. परिणामी, काँग्रेसमधील लोकप्रतिनिधी आणि अमेरिकन जनता मदतकार्यक्रमाबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते आणि मदतीच्या कार्यक्रमाला पाठिंबा देण्याच्या सरकारच्या धोरणाचे समर्थन करणे अवघड होऊन बसते. त्याशिवाय मदतविरोधी लोकमताला आणखीही काही कारणे आहेत. जे परदेश अमेरिकेकडून मदत घेतात त्यांच्याकडून अमेरिकेची अपेक्षा काय असते हेही स्पष्ट करण्यात आलेले नाही अगर येत नाही. अमेरिकेतील अनेक लोकांना मदतीची अपेक्षा असताना परदेशांना मदत देण्याबाबतही विरोध असतो. अमेरिकेच्या धोरणावर चांगल्या हेतूने टीका करणाऱ्यांचा एक वर्ग आहे. ह्या टीकाकारांची मदत-कार्यक्रमावर श्रद्धा आहे. पण त्यांच्या टीकेचा परिणाम मात्र मदतविरोधी लोकमताला दुजोरा देण्यात होतो.

### बँकांकडील ठेवींवरील व्याजात वाढ : यु. वे. बँकेचे चेअरमन, श्री. दामले, ह्यांची आग्रही सूचना फलद्रूप झाली.

"ठेवीदारांच्या हितासाठी त्यांना त्यांचा महत्त्वाचा वाटा निश्चितपणे दिला पाहिजे. कारण ठेवीदार हेच बँकेचे मुख्य आधार असतात. देशात आज सर्वच क्षेत्रात व्याजाच्या दरात वाढ झाली असताना त्यातील योग्य तो हिस्सा बँकांकडील ठेवीदारांना नाकारणे अयोग्य आहे." असे सांगून रिझर्व्ह बँकेने ठेवीवरील व्याजदरात वाढ करण्यास बँकांना परवानगी द्यावी अशा प्रकारची आग्रही सूचना प्रथमतः युनायटेड वेस्टर्न बँक लि. साताराचे चेअरमन श्री. वि. श्री. दामले यांनी बँकेच्या मुख्य कार्यालयाचे उद्घाटनाच्या वेळी उद्घाटनाचे अध्यक्ष केंद्रीय अर्थमंत्री मा. नामदार यशवंतरावजी चव्हाण यांना केली होती. तसेच याबाबत केन्द्रसरकारने आपुलकीने लक्ष घालण्यासंबंधीच्या धोरणाचा त्यांनी यापूर्वीही अनेक वेळा पाठपुरावा केलेला होता. नुकतेच रिझर्व्ह बँकेने दि. १–४–७४ पासून बँकांकडील ठेवीवरील व्याजदरात वाढ करण्यास परवानगी दिली असून श्री. दामले यांची सूचना फलद्रूप झाली आहे. श्री. दामले ह्यांनी बँकिंगमधील ठेवीदारांचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन त्यांच्या हितासाठी केलेले प्रयत्न त्यांच्या 'बँकिंगतज्ज्ञ' ह्या कीर्तीत भर घालणारेच आहेत.

### मुंबईजवळील तेल दोन वर्षांत मिळेल

मुंबईजवळ तेलासाठी संशोधन करण्यात येत आहे. त्यासंबंधी तेल आणि नैसर्गिक वायू मंडळाच्या एका अधिकाऱ्याने असा अंदाज व्यक्त केला आहे की तेथील तेलाच्या विहिरीतून प्रत्यक्ष तेल उत्पादन करण्याच्या कामास दोन वर्षे लागण्याची शक्यता आहे. सध्या जेथे खोदाई चालू आहे त्या ठिकाणच्या भूस्तरांच्या अंतर्भागाचा नीट अभ्यास करण्यासाठी सामान्यतः ४ ते ५ वर्षे लागतील. तथापि सध्या खोदण्यात आलेल्या विहिरीजवळच काही नव्या विहिरी खोदून तेलाचे प्रायोगिक उत्पादन करता येणे शक्य असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. खोदाई २ हजार मीटरपर्यंत जाण्यास एप्रिलचा पहिला आठवडा उजाडेल असे दिसत आहे.

---

### पाच बँकांना फसवणारी आंतरराज्य टोळी

उत्तर प्रदेश, राजस्तान आणि मध्यप्रदेश राज्यांच्या पोलिसांनी बँकांना फसविणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा शोध लावून त्यातील सात जणांना अटक केली आहे. ह्या टोळीने वरील राज्यांतील पाच बँकांना फसवून ४·३७ लाख रुपयांची कमाई केलेली आढळून आली. टोळीतील आणखी माणसांचा तपास चालू आहे. टोळीने देशातील इतर भागातील कांही बँकांनाही आपला हात दाखविला आहे. बँकांवर बनावट डिमांड ड्राफ्ट काढून टोळीने १० लाख रुपये उपटण्यात यश मिळविले. लखनौ येथील स्टेट बँक ऑफ इंडिआच्या ४ शाखांना बनवून गेल्या फेब्रुवारीत त्यांनी १·४७ लाख रुपये मिळविले होते. कापडाचे मोठे व्यापारी आहो असे भासवून टोळीतील लोकांनी बँकांच्या शाखांचा चांगलाच विश्वास संपादन केला होता.

---

### डिझेल तेलाच्या टंचाईचा तडाखा

श्रीरामपूर-कोपरगाव विभागात डिझेल तेलाची टंचाई तीव्रतेने जाणवत आहे. त्यामुळे त्या भागातील साखर कारखानदारीत चिंतेचे वातावरण पसरले आहे. ह्या भागात १२ साखर-कारखाने आहेत. तेलाच्या टंचाईमुळे कारखान्यात आणावयाच्या उसाच्या वाहतुकीवर वाईट परिणाम झाला आहे. बहुतेक कारखान्यांनी आपल्या कारखान्यापासून १०० ते १५० मैलांच्या टापूंतील ऊस खरेदी केला आहे. परंतु डिझेलच्या टंचाईमुळे ऊस कारखान्यात आणणे फार कठीण झाले आहे. नेहमीची बैलगाड्या वापरण्याची पद्धत अपुरी पडत आहे. उसाची वाहतूक करण्यासाठी वापरात असलेल्या ५०० वर वाहतूक गाड्या कित्येक तास जागच्या जागीच उभ्या राहात आहेत. त्यामुळे हंगाम लवकर संपण्याची शक्यता आहे.

---

किमतींचा निर्देशांक आणखी वाढला—ऑक्टोबर १९७२ मध्ये किमतींचा निर्देशांक २५५ होता तो नोव्हेंबरमध्ये २५९, डिसेंबरमध्ये २६० आणि जानेवारी १९७३ मध्ये २६४ झाला.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.







सोल सेलींग एजन्टस्

नोगी सेल्स् कॉर्पोरेशन

१७० जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई २. बी आर.

MARATHI

IMPORT
SUBSTITUTE
GADRE KEYS




ALL TYPES AS
PER SPECIFICATION

GADRE BROTHERS MADHAVNAGAR
PHONE NO 2318 GRAM "SEWA"

Swastik FOAM

cosy
sitting
pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth,
**BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. **KAMAT,**
*General Manager.*

# तुमच्यां उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



Madison/TGM/7 Mar

**TF ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राऊन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २

१६ अपोलो स्ट्रीट, मुंबई-१.



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)